निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* नांदेड * परभणी * हिंगोली

* वर्ष १० वे * अंक २८४ * किंमत - २ रु
RNI.No. MAH/MAR2014/56289
* रविवार दि.१५ फेब्रुवारी २०२६
* पाने-४

## गायरान-परमपोक जमिनींवर भूमाफियांचा डल्ला; ग्रामपंचायत यंत्रणा मूकदर्शक?

### कोठारीत शासकीय मालमत्ता लाटण्याचा संगनमताने सुरू 'सिस्टमॅटिक' खेळ

* आत्ताच एक्सप्रेस
* लक्ष्मीकांत मुंडे

**किनवट –** किनवट तालुक्यातील कोठारी (चि.) येथे शासकीय गायरान व परमपोक जमिनींवर भूमाफियांनी उघडपणे कब्जा करण्याचा सपाटा लावल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या संशयास्पद भूमिकेमुळे हा सगळा प्रकार संगनमताने सुरू असल्याचा ठपका स्थानिक नागरिकांकडून ठेवण्यात येत आहे.

गेल्या काही वर्षांत शासकीय जमिनींचे कागदोपत्री खेळ करून त्या खासगी ले-आउटमध्ये रूपांतरित केल्या जात असल्याचे दिसून येत आहे. जनावरांच्या चाराईसाठी राखीव असलेल्या गायरान जमिनी आज धनदांडग्यांच्या प्लॉटिंगसाठी वापरल्या जात आहेत. परमपोक व इनामी जमिनींचाही तसाच वापर करून कोट्यवधींची उलाढाल होत असल्याची चर्चा रंगली आहे.

विशेष म्हणजे एमआयडीसी परिसरालगतच्या जमिनींवरच हा प्रकार मोठ्या प्रमाणावर होत असल्याचा आरोप आहे. शासकीय जमिनी 'एन.ए.' दाखवून, कागदपत्रांचा बनाव करून आणि खोटे दाखले तयार करून त्या विक्रीस काढल्या जात असल्याचे सांगितले जाते. काही ठिकाणी आदिवासींच्या हक्काच्या जमिनीही गिळंकृत केल्याचा संशय व्यक्त होत आहे.

या संपूर्ण प्रकरणाबाबत स्थानिक प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. प्रशासनाकडून मौन बाळगले जात असल्याने "कोणाच्या आशीर्वादाने हा खेळ सुरू आहे?" असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे.

ग्रामपंचायत कार्यालयातूनच शासकीय जमिनींची माहिती गळती होऊन ती भूमाफियांपर्यंत पोहोचते का? अधिकाऱ्यांच्या सह्या-शिक्क्यांशिवाय इतका मोठा जमीन व्यवहार शक्य आहे का? अशा अनेक प्रश्नांनी परिसरात खळबळ उडाली आहे.

जर शासनाने तात्काळ चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई केली नाही, तर भविष्यात शासकीय जमिनींचा हा 'सिस्टमॅटिक लूटमार' प्रकार मोठ्या घोटाळ्यात परिवर्तित होण्याची भीती व्यक्त होत आहे. गावकऱ्यांनी या प्रकरणात उच्चस्तरीय चौकशी समिती नेमून दोषींना तुरुंगात पाठवावे, अशी ठाम मागणी केली आहे. शासकीय जमीन म्हणजे कुणाच्या बापाची मालमत्ता नाही; ती जनतेची आहे. आता प्रशासनाने कारवाई करायची की मूकदर्शक राहायचे?



## रिलायन्स जिओचा ढिसाळ कारभार उघड; किनवट तालुक्यात नेटवर्क ठप्प, जनतेचा संताप शिगेला

* आत्ताच एक्सप्रेस
* लक्ष्मीकांत मुंडे

**आत्ताच एक्सप्रेस**




गेल्या अनेक दिवसांपासून किनवट शहरासह संपूर्ण तालुक्यात कंपनीचे नेटवर्क पूर्णपणे कोलमडले असून हजारो ग्राहक अक्षरशः वेठीस धरले गेले आहेत. शहरातील मुख्य भागापासून ग्रामीण भागातील दुर्गम गावांपर्यंत कॉल लागत नाहीत, कॉल ड्रॉपची समस्या तीव्र आहे, तर इंटरनेट स्पीड इतका कमी झाला आहे की ऑनलाईन व्यवहार करणे अशक्य झाले आहे.

तालुक्यातील हजारो नागरिकांचे सिमकार्ड जिओ कंपनीचे असून अनेक शासकीय व खासगी कामे, बँक व्यवहार, शेतकऱ्यांचे अनेक अर्ज, विद्यार्थ्यांचे ऑनलाईन फॉर्म, स्पर्धा परीक्षा नोंदणी, डिजिटल पेमेंट व्यवहार हे सर्व जिओ नेटवर्कवर अवलंबून आहेत. मात्र नेटवर्क ठप्प झाल्यामुळे नागरिकांची कामे कोळंबून पडली आहेत. दिवसभर "नो सर्व्हिस" किंवा "इमर्जन्सी कॉल्स ओन्ली" अशी स्थिती निर्माण झाली आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, कंपनीकडून टॉवरचे नियमित मेंटेनन्स केले जात नाही. अनेक इमारतींवरील जिओ टॉवरचे भाडे वेळेवर न दिल्यामुळे काही इमारत मालकांनी टॉवर बंद केल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत. त्यामुळे कव्हरेज क्षेत्र मोठ्या प्रमाणात कमी झाले आहे. ग्रामीण भागातील परिस्थिती तर अधिकच गंभीर असून काही गावांत तासन्तास नेटवर्क गायब होत आहे. आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधणेही कठीण झाले आहे.

सेवा दर्जाहीन असताना रिचार्ज दर मात्र वेळेवर आणि वाढीव आकारले जात असल्याने ग्राहकांमध्ये तीव्र नाराजी आहे. "नेटवर्क नाही, इंटरनेट नाही, पण पैसे मात्र पूर्ण घेतले जातात" असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ग्राहक सेवा केंद्राकडे तक्रारी करूनही ठोस उपाययोजना होत नसल्याचा आरोप नागरिक करत आहेत.

जर येत्या काही दिवसांत नेटवर्कमध्ये तात्काळ आणि ठोस सुधारणा झाली नाही, बंद पडलेले टॉवर सुरू केले नाहीत, ग्रामीण भागात अतिरिक्त टॉवर उभारले नाहीत आणि मेंटेनन्सची जबाबदारी पार पाडली नाही, तर जनतेचा संताप उफाळून रस्त्यावर उतरण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागरिकांनी तीव्र आंदोलनाचा इशारा दिला असून परिस्थिती गंभीर बनत चालली आहे.

किनवट तालुक्यातील ग्राहकांना दर्जेदार सेवा देणे ही कंपनीची जबाबदारी आहे. अन्यथा कंपनीच्या ढिसाळ आणि निष्काळजी कारभाराविरोधात मोठ्या प्रमाणात लोकआंदोलन उभे राहील, असा इशारा संतप्त नागरिकांकडून देण्यात येत आहे.

## शेतकरी कर्जमाफीबाबत अगोदरच निर्णय झाला-उदय सामंत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** गेल्या अनेक महिन्यांपासून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा मुद्दा चर्चेत आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी काही महिन्यांपूर्वी प्रहार जनशक्ती संघटनेचे नेते बच्चू कडू यांच्यासह आदी नेत्यांनी नागपूरमध्ये मोठं शेतकरी आंदोलन केलं होतं. तेव्हा राज्य सरकारने शेतकऱ्यांची कर्जमाफी जून २०२६ मध्ये करण्याचं आश्वासन दिल्याचं सांगण्यात आलं होतं.

दरम्यान, आता शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. शिवसेना (शिंदे) पक्षाचे नेते तथा मंत्री उदय सामंत यांनी आज माध्यमांशी बोलताना शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. 'शेतकरी कर्जमाफीबाबत अगोदरच निर्णय झाला', असं उदय सामंत यांनी म्हटलं आहे.

राज्यातील सर्व बँकांकडून शेतकऱ्यांच्या थकित कर्जाची माहिती मागवण्यात आलेली आहे. बँकांना शेतकऱ्यांच्या थकित कर्जांबाबत माहिती देण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. त्यामुळे कर्जमाफीची घोषणा होण्याची शक्यता आहे का? असा प्रश्न पत्रकारांनी मंत्री उदय सामंत यांना विचारला.

यावर बोलताना मंत्री उदय सामंत यांनी म्हटलं की, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत अगोदरच निर्णय झालेला आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी कधी करायची? हे देखील राज्य सरकारने ठरवलेलं आहे. त्या संदर्भातील डेटा कलेक्ट झाला पाहिजे म्हणून सध्या ही कार्यवाही सुरू आहे", असं मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केलं आहे.

शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी बच्चू कडू यांनी आंदोलन केल्यानंतर सरकारने शेतकऱ्यांना कर्जाच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी अल्पकालीन आणि दीर्घकालीन उपाययोजना सूचवण्यासाठी प्रवीणसिंह परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आल्याचा निर्णय घेतला होता. ही समिती एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात अहवाल सादर करेल आणि त्यामध्ये समितीने केलेल्या शिफारशींचा अभ्यास करून ३० जून २०२६ च्या आधी शेतकरी कर्जमाफीबाबत निर्णय घेतला जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांना दिलं होतं.

सरकारने शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जमाफीच्या आश्वासनानंतर उदय सामंत यांनी तेव्हा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीवर एक महत्वाचं भाष्य करत म्हटलं होतं की, "कर्जमाफी नेमकी कशा पद्धतीने होणार आहे, याचाही आराखडा तयार झालेला आहे. जूनपर्यंत आम्ही शेतकऱ्यांची कर्जमाफी कशा पद्धतीने करणार आहोत, याची देखील यादी तयार होईल. त्याचा शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. सर्वात महत्वाचं हे आहे की ज्या पद्धतीने शब्द आपण देतो, तो शब्द पाळण्याची ताकद देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांच्यामध्ये आहे", असं उदय सामंत यांनी याआधीही म्हटलं होतं.

## माहूर नगरपंचायतीतील घरकुल निधी प्रकरण गंभीर

### आमदार भीमराव केराम यांचे जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन; लाभार्थ्यांना थकीत हप्ते तातडीने देण्याची मागणी



* आत्ताच एक्सप्रेस
* लक्ष्मीकांत मुंडे

माहूर – फेब्रुवारी २०२६ किनवट माहूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार भीमराव जी केराम यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सविस्तर निवेदन सादर करून माहूर नगरपंचायतीतील प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत लाभार्थ्यांना थकीत तिसरा व चौथा हप्ता तातडीने अदा करण्याची मागणी केली आहे. सन २०१७ ते २०२५ या कालावधीत मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांना आजपर्यंत संपूर्ण लाभ मिळाला नसल्याच्या असंख्य तक्रारी उपोषणाद्वारे प्राप्त झाल्या असून अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडली आहेत.

निवेदनानुसार, नगर पंचायत माहूर येथील मुख्याधिकाऱ्यांनी दिनांक ३०/५३१/२०२६ रोजी दिलेल्या पत्राद्वारे घरकुल योजनेचा निधी लाभार्थ्यांना वितरीत न करता तो इतर कामांसाठी वापरल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली असून निधीमध्ये अधिक गैरव्यवहार झाल्याचे नमूद केले आहे. यासंदर्भात Maharashtra Housing and Area Development Authority (म्हाडा), बेलापूर, नवी मुंबई यांनी दिनांक २२ जुलै २०२५ तसेच त्यापूर्वीही संदर्भीय पत्राद्वारे स्पष्ट निर्देश देत सदर निधी व्याजासह SNA खात्यात वर्ग करण्याचे आदेश दिले होते; मात्र सुमारे २ कोटी रुपयांची रक्कम आजपर्यंत जमा न झाल्याने लाभार्थी हक्काच्या लाभापासून वंचित राहिले आहेत.

या पार्श्वभूमीवर आमदार भीमराव केराम यांनी प्रकरण अत्यंत गंभीर असल्याचे नमूद करत जिल्हा प्रशासनाने तातडीने सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी व घरकुल लाभार्थ्यांना थकीत रक्कम त्वरित द्यावी, अशी ठाम मागणी केली आहे. "गरीब व गरजू कुटुंबांच्या हक्काच्या घरासाठी मंजूर झालेला निधी अन्यत्र वळविणे हा मोठा अन्याय असून संबंधितांवर कठोर कारवाई झाली पाहिजे," असे त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे. दरम्यान, घरकुल पूर्ण करूनही अंतिम हप्ता न मिळाल्याने अनेक लाभार्थी कर्जाच्या ओझ्याखाली दबले असून काहींची बांधकामे अर्धवट अवस्थेत आहेत. आता जिल्हाधिकारी कार्यालयाकडून या प्रकरणात काय भूमिका घेतली जाते आणि लाभार्थ्यांना न्याय केव्हा मिळतो, याकडे संपूर्ण किनवट-माहूर मतदारसंघाचे लक्ष लागले आहे.

## पैनगंगातीरी नागढव पेंदा यात्रेला उत्साहात सुरवात

### महाशिवरात्रीला पालखी सोहळा, १७ फेब्रुवारीला भव्य कुस्ती दंगल

* आत्ताच एक्सप्रेस
* लक्ष्मीकांत मुंडे



**किनवट –** किनवट तालुक्यात पैनगंगा नदीच्या तीरावर वसलेल्या नागढव पेंदा येथील प्रसिद्ध देवस्थानाच्या वार्षिक यात्रेला मागील दोन दिवसांपासून उत्साहात प्रारंभ झाला असून परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. दूरवरून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी दाखल होत आहेत. आज महाशिवरात्री निमित्त मंदिरात महादेवाची विशेष पूजा, गाथा पूजा तसेच पारंपरिक पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटेपासून अभिषेक, रुद्रपाठ व महाआरतीचे कार्यक्रम होणार असून सायंकाळी ढोल-ताशांच्या गजरात आणि 'हर हर महादेव'च्या जयघोषात गावातून पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे.

या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे दिनांक १७ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आलेली कुस्त्यांची भव्य दंगल होय. महाराष्ट्रातील विविध भागांतून नामांकित मल्ल या दंगलीत सहभागी होण्यासाठी येत असून पारंपरिक मातीच्या आखाड्यात रंगणाऱ्या या कुस्त्यांकडे क्रीडाप्रेमींचे विशेष लक्ष लागले आहे. विजेत्या मल्लांना आकर्षक बक्षिसे व सन्मानचिन्हे देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

यात्रेच्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागामार्फत प्राथमिक उपचार केंद्र, आपत्कालीन वैद्यकीय सुविधा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच स्वच्छतेबाबत आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी किनवट पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. गर्दी नियंत्रण, वाहतूक सुरळीत ठेवणे आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस प्रशासन सतर्क आहे.

नागढव पेंदा येथील मंदिराचे सर्व विश्वस्त मंडळ, ग्रामस्थ व स्वयंसेवक यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेत असून भाविकांना कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी निवास, प्रकाश व्यवस्था व इतर मूलभूत सोयी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. धार्मिक श्रद्धा, पारंपरिक संस्कृती आणि क्रीडारंग यांचा संगम असलेली ही नागढव पेंदा यात्रा किनवट तालुक्यातील एक महत्त्वाचा सांस्कृतिक सोहळा ठरत असून महाशिवरात्रीच्या निमित्ताने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे.

## मुलींना सुरक्षा, सन्मान आणि त्यांचा आवाज द्या!

### 'महिलांची छेडछाड आणि पाठलाग' कार्यशाळेत विजया रहाटकर यांचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**



**अहिल्यानगर–** मुली आणि महिलांना सुरक्षा, सन्मान देणं ही पोलिसांबरोबरच कुटुंबीय आणि समाजाचीही जबाबदारी आहे. मुलींना आपला आवाज उठवता आला पाहिजे; अन्यथा प्रारंभी किरकोळ वाटणारी छेडछाड आणि पाठलागाची घटना गंभीर बनू शकते, असे मत राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष ॲड. विजया रहाटकर यांनी आज, शनिवारी नगरमध्ये बोलताना सांगितले.

स्नेहालय संस्था आणि राष्ट्रीय महिला आयोगाच्या वतीने 'महिलांची छेडछाड आणि पाठलाग' या विषयावरील दोन दिवसांच्या राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उदघाटनप्रसंगी विजया रहाटकर बोलत होत्या. अतिरिक्त पोलिस महासंचालक आश्वती दोरजे (महिला सुरक्षा), तेलंगणामधील प्रज्वला संस्थेच्या डॉ. सुनिता कृष्णन, तेलंगणाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक महेश भागवत, न्यायाधीश योगेश पैठणकर, ॲड. शिरीन मर्चंट, जिल्हा पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे आदी उपस्थित होते.

रहाटकर म्हणाल्या, मुलींची छेड काढणं, तिच्या इच्छेविरुद्ध पाठलाग करणे ही अतिशय गंभीर गोष्ट आहे. मुलींनी त्याविषयी लगेच पालकांना सांगितलं पाहिजे. 'असं होत असतं, दुर्लक्ष कर, तुझा रस्ता बदल', अशी समजूत बरेच पालक घालतात. अनेक घरांत पालक आणि मुलांमध्ये संवादच नसतो. त्यामुळे पालकांशी बोलायला मुली घाबरतात.

मत्रांना सांगावं, तर ते गैरफायदा घेण्याची शक्यता असते. अशावेळी मुलींची घुसमट होते. त्या घरातून बाहेर पडायला घाबरू लागतात, एकलकोंडी बनतात, मानसिक आजाराची शिकार होतात. ज्या घरात मुलीला तिचं म्हणणं मोकळेपणानं पालकांना सांगता येतं, ती कधीच पिडीत, शोषित होणार नाहीत.

'स्नेहालय'चे संस्थापक डॉ. गिरीश कुलकर्णी यांनी महिलांसाठी संस्था करत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली. यापुढे 'व्हॅलेंटाईन डे' हा 'अँटी स्टॉकिंग डे' म्हणून साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले. विजया रहाटकर यांनीही त्यास समर्थन दिलं. 'स्नेहाधार'च्या अहिल्यानगर आणि पुण्यातील कामांची विद्या घोरपडे आणि मानसी चंदगडकर यांनी माहिती दिली.

स्नेहालयचे संचालक हनिफ शेख यांनी संस्थेच्या विविध प्रकल्पांची माहिती दिली. नीक कॉक्स, तसेच स्वाती भटकळ यांनी 'स्टॉकिंग' या विषयावर तयार केलेल्या चित्रफिती सादर केल्या. यावेळी चेहऱ्याच्या टाल्कमयुक्त पावडरचे उत्पादन आणि विक्री यावर भारतात बंदी घालण्यात आयोगाने पुढाकार घ्यावा, अशा मागणीचे निवेदन स्नेहालय व उपस्थित संस्थानी निवेदनाद्वारे ॲड. रहाटकर यांच्याकडे केली.

राष्ट्रीय महिला आयोग केवळ तक्रारी ऐकण्यासाठी नसतो, तर महिलांसाठीच्या कायद्यांत सुधारणा करण्याबरोबरच नवे कायदे करण्यासाठी केंद्र सरकारला आयोग सूचनाही करू शकतो, असे आयोगाच्या अध्यक्ष ॲड. रहाटकर यांनी सांगितले. 'पाठलाग' या विषयावर देशभर कार्यशाळा घेऊन यासंबंधी ठोस पावलं उचलण्यासाठी सरकारला सांगण्यात येईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

# सृष्टीचे पालनहार ''देवादी देव महादेव''


भोले शंकर संपूर्ण सृष्टीचे व सर्वांचेच तारणहार दैवत आहे.असे सांगण्यात येते की संपूर्ण ब्रम्हांडामध्ये ३३ कोटी देवी-देवतांचा वास आहे. परंतु यात सर्वांचे पालनहार देवादी देव महादेव म्हणजेच ''शिव-पार्वती'' आहे. त्यामुळे शंकरजीला भोल्या शंकरा म्हटल्या जाते. समुद्र मंथनाच्या वेळेस जे विष निघाले ते शंकरजीनी प्राशन करून संपूर्ण सृष्टीला वाचविले व विष प्राशन केल्याने त्यांचा कंठ निळा झाला. शंकराचा वास सर्वसाधारण ठिकाणापासून तर स्मशान भूमीपर्यंत दिसून येतो.म्हणजेच आकार -पाताळ-पुर्व-पश्चिम-उत्तर-दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला कोणत्या ना कोणत्या रूपात भगवान शंकरजींचे दर्शन अवश्य होते.त्यामुळेच हिंदु मान्यतेनुसार शंकराच्या मुर्तीची किंवा पिंडाची पुजा केली जाते.भोले शंभर सर्वसामान्यांचेच देवता नसुन मानव-देव -दानव-किन्नर सर्वांचे आराध्य दैवत आहे.त्यामुळे आजही नागव्दार,महादेव,पचमडी इत्यादी अनेक ठिकाणी हजारोंच्या संख्येने भाविक दरवर्षी महादेवाच्या दर्शनाला जातात व भोल्या शंकराचे दर्शन घेऊन आपली मनोकामना पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. रावनासारखा महाग्यानी घोर राजनितीज्ञ हा सुद्धा शंकरजीचा कट्टर भक्त होता. रावणाची भक्ती पाहून शंकरजी प्रसन्न होऊन त्यांना बलशाली होण्याचे वर्दानसुध्दा दीले होते.त्यामुळे शंकरजीची पुजा करण्याचा अधिकार सर्वांनाच आहे.कारण शंकरजींची महीमा अपरंपार आहे.याच उद्देशाने शंकरजींनी आपले वास्तव्य सर्वसामान्यांपासून तर स्मशान भुमीपर्यंत अजरामर ठेवले आहे.आज स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ, पुर्व-पश्चिम, उत्तर- दक्षिण या संपूर्ण ठिकाणी आपल्याला भोले शंकराचे दर्शन होते.आज आपण नद्यांचा उगम पहातो तो उगम शंकरजींच्या जटेतुन झाल्याचे अनेक कथा व पुराणात पहातो. कोणी मानो अथवा न मानो परंतु आपण या पृथ्वीतलावर हसतो,खेळतो,बागडतो यांचे मुख्य कारण म्हणजे या ब्रम्हांडातील देवी-देवतांचा वासच आहे. कोणतीही देवी-देवता असो त्यांचे स्मरण केल्याने मानसाच्या ह्रदयात व मनात एक उत्सहाचे वातावरण निर्माण होते नवीन ऊर्जा निर्माण होते. कोणताही देव दीसत नसला तरी मनात असला पाहिजे व संपूर्ण शक्ती सत्कर्मासाठी समर्पीत केली पाहिजे.आज संपूर्ण निसर्ग जो आपल्याला दिसतो त्यात लाखोंच्या संख्येने अनेक वृक्ष, फुले,फळे दिसून येते ही संपूर्ण ईश्वरी देनच आहे.परंतु संपूर्ण निसर्गाची रक्षा करने मानवजातीचे प्रथम कर्तव्य आहे.आपण सत्कर्माचा मार्ग अवलंबवीला तर देवादी देव महादेव आपणापर्यंत अवश्य येईल. महाशिवरात्री हा हिंदू धर्माचा पवित्र सन आहे.त्यामुळे महाशिवरात्री हा सन मोठ्या भक्तिभावाने सर्वत्र साजरा केल्या जातो. त्यामुळे आपल्याला सर्वत्र उत्सहाचे व मंगलमय वातावरण दिसून येते. महाशिवरात्रीला बेलपत्ती,गोंगलाचे फुले, आंब्याचे पाणीखायचे पान याला जास्त महत्व असते. म्हणजे पृथ्वीतलावरील प्रत्येक झाडाला, फळांना किंवा फुलांना आगळेवेगळे महत्व असते हे आपल्याला दिसुन येते.महादेवाचे गुणगान गाण्यांच्या स्वरूपात आपल्याला ऐकायला व पहायला मिळते. संपुर्ण भारतात १२ ज्योतिर्लिंग आहेत त्यापैकी ५ महाराष्ट्रात आहे.त्र्यंबकेश्वर, परळी बैजनाथ, भिमाशंकर, औंढा नागनाथ, घृष्णेश्वर ही बाब महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवशाली बाब आहे.या व्यतीरीक्त महाराष्ट्रासह भारतात भगवान शंकरजीचे अनेक मंदिरे आहेत.यावरून स्पष्ट होते की भगवान शंकरजीवर सर्वांचीच आस्था



आहे.त्याच प्रमाणे ॐ नमो: शिवाय ,ॐ शांती,हर हर महादेव इत्यादींचा जप केल्याने मन प्रसन्न रहाते,शांती मिळते, आरोग्याच्या दृष्टीकोणातु ओम नमो शिवाय हा जप महत्वपूर्ण मानल्या जातो यामुळे अनेक आजार दुर होण्यास मोठी मदत मिळते. आपण भोले शंकराचा जयघोष शिवकालीन इतिहासामध्ये सुध्दा ऐकली व पहाली आहे.शिवाजी महाराज व मावळे लढाईवर जातांना ''हर हर महादेव''चा जयघोष करीत असे.यामुळे सैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण होवून एक नवीन उर्जा निर्माण होत होती.त्याचप्रमाणे आजही आपल्याला प्रत्येक शंकरजींच्या मंदिरात भाविकांचा ''हर हर महादेव ''चा जयघोष ऐकायला मिळतो.यामुळे सर्वांचेच मन प्रसन्न होते व नवीन ऊर्जा निर्माण होते.याचे मुख्य कारण म्हणजे देवादी देव महादेव हे सर्वांचेच पालनहार दैवत आहे.महाशिवरात्रीच्या सणाला लहान -मोठे, आबालवृद्धा सारखे संपूर्ण भावीक मोठ्या उत्साहाने उपवास ठेवतात यामागचा एकच उद्देश असतो की हे देवादी देव महादेव येणारे विघ्न टळुदे व सुख-शांती प्रदान कर. कारण आपण सुखी तर देश सुखी, देश सुखी तर संपूर्ण सृष्टी सुखी.महाशिवरात्रीच्या निमित्ताने मी हेच सांगु इच्छितो की स्थल,जल,वायु व निसर्ग याची जोपासना मानवजातीने वेळोवेळी केलीच पाहिजे.कारण बदलते हवामान व यामुळे वाढते प्रदुषण, जंगलातील हिंसक पशु शहरात प्रवेश करने, जंगलाला वनवे लागने,हिमकडा कोसळुन महाप्रलय येणे, सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक,अती उष्णता,अती थंडी,भुकंप याला रोखण्यासाठी संपूर्ण मानवजातीने निसर्गाची जोपासना केलीच पाहिजे. अन्यथा देवादी देव महादेव विक्राळ रूप सुध्दा धारण करू शकते.यालाही नाकारता येणार नाही. याचे अनेक उदाहरणे आपल्या समोर आहे.आपण निसर्गाची निर्मळ मनाने सेवा व जोपासना केली तर देवांदी देव महादेव अवश्य प्रसन्न होतील.यात दुमत नाही.देशात महाप्रलय, भुकंप, अती उष्णता,अती थंडी, सुनामी,वनवा लागणे, प्रदुषणात वाढ होणे व हवामानातील बदल या संपूर्ण गोष्टी निसर्गावर होत असलेल्या अन्याय व अत्याचारामुळे दिसून येते.देवादी देव महादेवाचा वास दऱ्या-खोऱ्यात, पहाडात, जंगलात, निसर्गानिच्या सान्निध्यातील काणा -कोपऱ्यात व कणाकणात आपल्याला पहायला मिळतो. त्यामुळे महाशिवरात्रीच्या सनाच्या निमित्ताने निसर्गाची जोपासना करण्यासाठी सर्वांनीच संकल्प केला पाहिजे व निसर्ग संपदा विनाशापासुन वाचविली पाहिजे.महाशिवरात्रीच्या निमित्ताने प्रत्येकांनी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.कारण प्रत्येक वृक्षाच्या पानात, फुलात, फळात आपल्याला भोले शंकराचे दर्शन अवश्य होईल.त्याचबरोबर वृक्ष लागवडीमुळे गुरांना चारा, मानवाला शुद्ध हवा व सर्वांनाच शुद्ध ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल. महाशिवरात्रिच्या निमित्ताने जर वृक्षलागवड झाली तर देशात एकाच दिवशी लाखोंच्या संख्येने वृक्ष लागवड सहज होईल व निसर्ग प्रफुल्लित होण्यास मोठी मदत मिळेल.हर हर महादेव!

**- रमेश कृष्णराव लांजेवार,**
नागपूर.

# ग्रामसभा : गावाच्या लोकशाहीचा खरा आत्मा; हे आपल्याला कधी समजणार?



भारतीय लोकशाहीचा पाया शहरांतील मंत्रालयांमध्ये नसून तो थेट गावाच्या मातीशी जोडलेला आहे. देशाच्या लोकशाहीची खरी ताकद संसदेत नव्हे, तर गावाच्या ग्रामसभेत दडलेली आहे. ग्रामपंचायत आणि ग्रामसभा या केवळ प्रशासकीय यंत्रणा नसून त्या ग्रामीण भारताच्या लोकशाहीचे जिवंत प्रतिबिंब आहेत. गावाचा विकास, निधीचा योग्य वापर, पारदर्शकता आणि लोकसहभाग यांचा केंद्रबिंदू म्हणजे ग्रामसभा. मात्र दुर्दैवाने आज अनेक गावांमध्ये ग्रामसभा ही केवळ कागदोपत्री प्रक्रिया बनत चालली आहे.

ग्रामपंचायत ही गावातील सर्वात खालची, पण सर्वात महत्त्वाची स्वराज्य संस्था आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, घरकुल, मनरेगा, सामाजिक न्यायाच्या विविध योजना अशा अनेक कामांची अंमलबजावणी ग्रामपंचायतीमार्फत केली जाते. मात्र या सर्व कामांवर नियंत्रण ठेवणारी, दिशा देणारी आणि उत्तरदायित्व निश्चित करणारी सर्वोच्च संस्था म्हणजे ग्रामसभा. ग्रामसभा म्हणजे गावातील सर्व पात्र मतदारांची एकत्रित बैठक. सरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामसेवक हे ग्रामसभेला उत्तरदायी असतात. त्यामुळे ग्रामसभा ही कोणावर उपकार म्हणून घेतली जाणारी सभा नसून तो गावकऱ्यांचा मूलभूत लोकशाही हक्क आहे.

ग्रामसभेचे महत्त्व यासाठीही अधिक आहे की येथे गावातील विकासकामांचा आणि खर्चाचा खुलेपणाने आढावा घेतला जातो. कोणती कामे झाली, कोणती अपूर्ण राहिली, निधी कुठे आणि कसा खर्च झाला, कोणत्या योजनेचा लाभ कोणाला मिळालायाची माहिती ग्रामसभेत मांडली जाते. त्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसतो आणि प्रशासनावर लोकांचा अंकुश राहतो. योजनांचा लाभ केवळ कागदावर न राहता प्रत्यक्ष गरजूंपर्यंत पोहोचतो. गावाच्या गरजा गावकरीच सर्वात अचूकपणे सांगू शकतात आणि त्यासाठी ग्रामसभा हे सर्वोत्तम व्यासपीठ आहे.



**बबन वानखेडे**
पत्रकार तथा
सामाजिक कार्यकर्ते

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ आणि संबंधित नियमांनुसार ग्रामसभा घेणे बंधनकारक आहे. वर्षातून किमान चार ग्रामसभा घेणे कायद्याने आवश्यक आहे. प्रजासत्ताक दिन, महाराष्ट्र दिन, स्वातंत्र्य दिन आणि गांधी जयंती या दिवशी ग्रामसभा घेण्याची स्पष्ट तरतूद आहे. याशिवाय गरज भासल्यास विशेष ग्रामसभा घेता येते. ग्रामसभेची किमान सात दिवस आधी पूर्वसूचना देणे, ग्रामस्थांना विविध माध्यमांतून माहिती देणे, स्पष्ट अजेंडा जाहीर करणे आणि ग्रामसभेतील ठरावांची नोंद ठेवणे ही ग्रामपंचायतीची जबाबदारी आहे. मात्र ठराव मांडून थांबणे पुरेसे नाही; त्यांची अंमलबजावणी होणे तितकेच महत्त्वाचे आहे.

तथापि वास्तव वेगळेच चित्र दाखवते. अनेक ठिकाणी ग्रामसभा मुद्दाम टाळल्या जात असल्याचे दिसते. काही ठिकाणी उपस्थिती कमी दाखवली जाते, तर काही ठिकाणी सभा झाली असल्याचे कागदोपत्री दाखवले जाते. ग्रामसभा घेतली तर प्रश्न विचारले जातील, खर्चाचा हिशेब मागितला जाईल, कामातील त्रुटी समोर येतीलया भीतीपोटी काही सरपंच आणि ग्रामसेवक ग्रामसभा म्हणजे डोकेदुखी असल्यासारखे वागतात. ही मानसिकता लोकशाहीच्या मुळावर घाव घालणारी आहे.

ग्रामसभा न घेणे हा कायद्याचा थेट भंग आहे. अशा प्रकरणात नागरिकांना तक्रार करण्याचा पूर्ण अधिकार आहे. पंचायत समिती, गट विकास अधिकारी, उपविभागीय अधिकारी किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार करून कारवाईची मागणी करता येते. चौकशीत दोषी आढळल्यास सरपंच किंवा ग्रामसेवकावर दंड, निलंबन किंवा पदावरून काढून टाकण्यासारखी कठोर कारवाई होऊ शकते. त्यामुळे ग्रामसभा टाळणे हे कोणाच्याही हिताचे नाही.

या संपूर्ण प्रक्रियेत ग्रामस्थांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. ग्रामसभा ही सरकारची किंवा ग्रामपंचायतीची कृपा नसून गावकऱ्यांचा हक्क आहे, ही जाणीव प्रत्येक नागरिकाने ठेवली पाहिजे. ग्रामसभेला उपस्थित राहणे, प्रश्न विचारणे, सूचना देणे, विकासकामांवर लक्ष ठेवणे आणि गरज पडल्यास लेखी मागण्या करणे हे जागरूक नागरिकांचे कर्तव्य आहे. ग्रामसभा होत नसेल तर त्याविरोधात आवाज उठवणे हीदेखील लोकशाहीची जबाबदारी आहे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की ग्रामसभा मजबूत असेल तर गाव सक्षम होईल. पारदर्शक, नियमित आणि लोकसहभागातून होणारी ग्रामसभा हीच गावाच्या विकासाची खरी गुरुकिल्ली आहे. ग्रामसभा ही केवळ औपचारिक बैठक नसून ती गावाच्या भविष्याचा निर्णय घेणारी लोकशाहीची प्रयोगशाळा आहे. ग्रामीण नागरिकांनी हे महत्त्व ओळखून ग्रामसभेच्या माध्यमातून आपल्या गावाचा विकास स्वतःच्या हातात घ्यावाहीच आजच्या काळाची गरज आहे.

# दलितांच्या व्यथा,वेदना साहित्यातून अभिव्यक्त करत विद्रोह पेरणारा विद्रोही बंडखोर - पद्मश्री नामदेव ढसाळ

दलित अन्याय अत्याचाराची मालिका खंडित होत नाही
स्वातंत्र्य नावाची रंडी इथं कधी नांदत नाही
मुकी बहिरी झाली ही वांझ व्यवस्था
आक्रोश हिला आमचा दिसत नाही

अश्या प्रखर शब्दात व्यवस्थेवर घणाघाती प्रहार करत विद्रोही बाण्याने व्यवस्थेला फाट्यावर कोलणारे विद्रोही बंडखोर,वेदना आणि विद्रोहाचे स्फूल्लिंग चेतवणारे आंबेडकरी विचारवंत,मराठी साहित्य विश्वात दलित साहित्याला नवी दिशा देत परिवर्तन घडवणारे, परिवर्तनवादी प्रातिभीक सामर्थ्य लाभलेले जेष्ठ साहित्यिक,दलित चळवळ बुलंद करण्यासाठी '' दलित पँथर '' ही विद्रोही सामाजिक संघटना संस्थापित करणारे,महानगरीय जीवनावर लिहिणारे बोली भाषेत लिखाण करणारे मराठीतील एक महत्वाचे लेखक,आपल्या शब्दांनी प्रस्थापितांच्या सत्तेला हादरा देणारे बौद्ध दलित चळवळीतील क्रांतिकारी सूर्य म्हणजे पद्मश्री नामदेव लक्ष्मण ढसाळ होत.

नामदेव ढसाळ दलित चळवळीतील एक अग्रगण्य नाव.ज्यांनी दलितांच्या व्यथा वेदना जाणल्या.नुसत्याच त्या जाणल्या नाही तर आपल्या लेखणीतून,साहित्यातून त्या व्यथा वेदना सर्वांसमोर मांडत त्याला न्याय मिळावा यासाठी त्यांनी तितक्यात ताकतीने लढा उभारला.नामदेव ढसाळ यांचा जन्म १५ फेब्रुवारी १९४९ रोजी महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यात झाला.ढसाळ यांनी साहित्यातून अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे कार्य केले.त्यांच्यावर महामानव,भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर तसेच शांती आणि करूणेचा संदेश देणारे तथागत गौतम बुद्ध यांचा प्रभाव होता.



नामदेव ढसाळ यांना त्यांच्या साहित्यिक योगदानाबद्दल अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे.त्यांच्या '' गोलपिठा '' या साहित्यकृतिस महाराष्ट्र राज्य पुरस्कार मिळाला आहे.सोव्हीयत लँड नेहरू पुरस्कार, महाराष्ट्र राज्य कवी केशवसुत पुरस्कार,१९९९ मध्ये पद्मश्री पुरस्कार, बहिणाबाई चौधरी पुरस्कार, २००५ रोजी साहित्य अकादमी स्वर्ण महोत्सव निमित्त जीवनगौरव पुरस्कार,२००६ रोजी गंगाधर गाडगीळ साहित्य पुरस्कार, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मृती पुरस्कार, बुद्ध रोहिदास विचार गौरव पुरस्कार असे अनेक पुरस्कार मिळालेले आहेत.पद्मश्री नामदेव ढसाळ यांनी साहित्य क्षेत्रातील योगदान वाखानण्याजोगे आहे. त्यांनी १९७२ साली त्यांचा पहिला कवितासंग्रह '' गोलपीठा '' प्रकाशित केला.यात त्यांनी विद्रोही बंडखोरी करत व्यवस्थेविरोधात शब्दाशब्दातुन चपराक सडकवला.त्यानंतर त्यांनी आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र -प्रियदर्शनी,खेळ,तुही इयत्ता कंची, तुझे बोट धरून चाललो आहे,मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे,गांडू बगीचा, या सत्तेत जीव रमत नाही,मूर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलवले,मी भयंकराच्या दरवाज्यात उभा आहे व निर्वाणा अगोदरची पिडा असे कवितासंग्रह प्रसिद्ध केले. याच बरोबर त्यांनी निगेटिव्ह स्पेस,उजेडाची काळी दुनिया व हाडकी हडवळा या तीन कादंबऱ्या देखील लिहिल्या आहेत. अंधार यात्रा हे नाटक देखील त्यांनी लिहिलेले आहे.तसेच बुद्ध धर्म काही शेष प्रश्न,आंबेडकरी चळवळ,आंधळे शतक सर्व काही समष्टीसाठी असे चिंतनपर लेख ही लिहिलेले आहेत.नामदेव ढसाळ यांच्या मृत्युंनतर त्यांचे '' दलित पँथर - एक संघर्ष '' हे चिंतनपर लेखन २०१४ साली प्रकाशित करण्यात आले.

१९७२ मध्ये त्यांनी चळवळीत काम करत असताना दलित चळवळीतील समवयस्क सहकारी तसेच साहित्यिकांच्या साथीने '' दलित पँथर '' या आक्रमक संघटनेची स्थापना केली.त्यांच्या या चळवळीवर अमेरिकेतील ब्लॅक पँथर या चळवळीचा मोठा प्रभाव होता.यां संघटनेतुन त्यांनी दलितांच्या प्रश्नांना, अन्याय अत्याचाला वाचा फोडली,दलितांच्या अनेक प्रश्नासाठी उग्र आंदोलने केली.त्यावेळेस च्या सरकारला दलित हिताचे निर्णय घेण्यासाठी त्यांनी प्रवृत्त केले.मराठवाडा विद्यापीठ नामांतर लढ्यातही त्यांचे मोलाचे योगदान आहे.

तोंड वाजवून न्याय मिळत नसेल तर तोंडात वाजवून न्याय मिळवायचा.माझ्या संघटनेत काम करायचे असेल तर चळवळीत काम करायचं असेल तर मन घट्ट करावे लागेल.मार खायला शिकलं पाहिजे.संघटनेत नीट काम केलं नाही ना तर गांडीवर लात मारून काढून देईन.समाजासाठी काम करता येत नसेल तर चोरी मारी,दरोडेखोरी, बलात्कारी सोडून बाकीचे जे काही पोटापाण्याचे धंदे आहेत ते करा.पैसे मिळवण्याचा धंदा करावा.आणि काही जमलं नाही तर मटका बुकी चा धंदा करा,दारू विका. कोण पोलीस येतो,काय करतो यासाठी मी तुमच्या पाठीमागे आहे.असे आपल्या कार्यकर्त्यांना ते म्हणायचे.बाबासाहेबाचं नाव घ्यायचं, फुलेंचं नाव घ्यायचं आणि आपली पोटाची खळगी भरायची हे धंदे सोडून द्या. असे ते कार्यकर्त्यांना स्पष्टपणे सांगायचे.

अश्या या गरीब,शोषितांचा अन्याय अत्याचाराला आपल्या लेखणीतून वाचा फोडत त्याविरोधात लढणाऱ्या योध्याचा अंत वयाच्या ६४ व्या वर्षी १५ जानेवारी २०१४ रोजी झाला. त्यांच्या जाण्याने आंबेडकरी चळवळीचे आणि दलित पँथर चे न भरून निघणारे नुकसान झालेले आहे. आजही दलित पँथर ही सामाजिक संघटना त्यांना सांगितलेल्या तत्वावर कार्य करत आहे.त्यांचा लढा प्रत्येक ठिकाणी त्यांच्याच पद्धतीने हाताळत आहेत.खऱ्या अर्थाने नामदेव ढसाळ यांनी जाता जाता विद्रोहाची ज्वाला येणाऱ्या पिढीत पेटवली.अन आता अनेक कवी, लेखक, सामाजिक कार्यकर्ते त्यांची प्रेरणा घेऊन अन्यायाला वाचा फोडण्याचे कार्य करत आहेत.

अन्याय अत्याचाराची चिड होता नामदेव
सामाजिक लढ्याची लीड होता नामदेव
छिनाल व्यवस्थेला फाट्यावर कोलणारा
आंबेडकरी चळवळीची ग्रीड होता नामदेव

**- विजय नारायण वाठोरे,**
**नांदेड**
तालुकाअध्यक्ष - दलित पँथर (नामदेव ढसाळ )
संपर्क - ९९७५५९३३५९

# टाटा मोटर्स आणि महाराष्ट्र सरकार दुष्काळग्रस्त भागांमध्ये १,५०० अतिरिक्त जलसाठ्यांचे संवर्धन करणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई** - महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या कॉर्पोरेट-केंद्रित जलसंधारण उपक्रमाला अधिक बळ देत टाटा मोटर्सने मृदा व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र सरकारसोबत सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षरी केली आहे. या सामंजस्य करारांतर्गत २५ जिल्ह्यांमधील दुष्काळग्रस्त भागांमध्ये १,५०० अतिरिक्त जलसाठ्यांचे संवर्धन करण्यात येणार आहे. हे विस्तारीकरण सहयोग-केंद्रित जल संवर्धन उपक्रमावर आधारित आहे. या उपक्रमाने आधीच वर्ष २०२५ मधील उन्हाळ्यापासून १,४५० हून अधिक जलसाठ्यांचे संवर्धन केले आहे, ज्यामुळे ३,००० कोटी लिटरहून अधिक जल साठवण क्षमता निर्माण झाली आहे आणि महाराष्ट्रातील ग्रामीण भागांमधील जवळपास ७ लाख व्यक्तींना या क्षमतेचा लाभ झाला आहे.

सार्वजनिक-खाजगी-समुदाय संचालित जल संवर्धन उपक्रमाने महाराष्ट्रातील पाणीटंचाई असलेल्या काही भागांमध्ये वर्षभर पाणी उपलब्ध करून दिले आहे, भूजल पातळी वाढवली आहे आणि सिंचन सुविधा सुधारली आहे. पुढील टप्प्यामध्ये हा उपक्रम नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, पुणे आणि कोकण विभाग या जिल्ह्यांमध्ये विस्तार साधणार आहे.

या उपक्रमाच्या विस्तारीकरणाबाबत मत व्यक्त करत महाराष्ट्र सरकारचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ''गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार योजनेमधून विकेंद्रीकृत व समुदाय-केंद्रित उपाययोजनांच्या माध्यमातून दीर्घकालीन जल सुरक्षा निर्माण करण्याप्रती महाराष्ट्राची कटिबद्धता दिसून येते. टाटा मोटर्स अनेक वर्षांपासून राज्यासाठी बहुमूल्य सहयोगी आहे, तसेच कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीसह प्रामाणिक जबाबदार कंपनी म्हणून अर्थपूर्ण उपक्रम राबवत आहे. या सहयोगाच्या माध्यमातून आम्ही भूजल पातळी वाढवण्याप्रती आणि कृषी स्थिरता आणण्याप्रती आमचे प्रयत्न वाढवण्यासह दृढ केले आहेत, ज्यामुळे राज्यामध्ये पाणी उपलब्ध करून देण्यासह पाणीटंचाईचे निराकरण करण्याप्रती सरकारच्या प्रयत्नांना गती मिळाली आहे.

या उपक्रमाबाबत मत व्यक्त करत टाटा मोटर्सचे सीएसआर प्रमुख विनोद कुलकर्णी म्हणाले, जल संवर्धनाप्रती आमची कटिबद्धता सरकारी योजना, दीर्घकालीन सहयोग आणि सामुदायिक मालकीहक्कामध्ये सामावलेली आहे, ज्यासह मोठ्या प्रमाणात प्रभाव घडवून आणला जात आहे. कॉर्पोरेट निधीसाह्य सीएसआर प्रयत्नामधून अनुकरणीय व शाश्वत जल संवर्धन उपक्रमापर्यंत या उपक्रमाच्या उत्क्रांतीमधून महाराष्ट्र सरकारसोबतचा आमचा समान दृष्टिकोन दिसून येतो, तो म्हणजे शाश्वत जल उपाययोजना देणे, ज्या भूजल पातळी वाढवतात, वर्षभर पाणी उपलब्ध असण्याची खात्री देतात आणि ग्रामीण उदरनिर्वाह वाढवतात. आमची अंमलबजावणी सहयोगी म्हणून नाम फाऊंडेशनसोबत सहयोगाने आम्ही महाराष्ट्रातील ग्रामीण दुष्काळग्रस्त भागांमध्ये आम्ही अधिकाधिक पोहोचत राहू, तसेच उत्तम परिणाम साधत राहू.

# गंगाखेड येथे महाशिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## कायदेशीर विषयक सेवा व शासकीय योजनांचा महामेळावा एकाच छताखाली, न्यायमूर्ती संदीप कुमार सी. मोरे यांच्या हस्ते महाशिबिराचे उद्घाटन

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी** – मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबादचे न्यायमूर्ती संदिपकुमार सी. मोरे यांच्या हस्ते आज शासकीय योजनांचा महामेळावा व कायदेविषयक महाशिबिर गंगाखेड येथे संपन्न झाले. या शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष (जिल्हा विधी सेवा प्राधिकरण) उज्वला नंदेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या कार्यक्रमास जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर, न्यायाधीश-१ तथा गंगाखेड तालुका विधी सेवा समितीचे अध्यक्ष दिनेश डी. कुरुलकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

शासन हे सर्वस्तरावर जनतेच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत असते. शासनाच्या अनेक योजना ऑनलाईन उपलब्ध आहेत. जनतेने विशेषतः तरुणांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या योजनांचा लाभ घ्यावा, असे असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबादचे न्यायमूर्ती संदिपकुमार सी. मोरे यांनी केले.

नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण व्हाव्यात आणि योजना थेट लाभार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात, यासाठी या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच, जनतेच्या कायदेविषयक अडचणी सोडविण्यासाठी विधी सेवा प्राधिकरण प्रभावीपणे कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी, तालुका विधी सेवा समिती, गंगाखेड आणि जिल्हा प्रशासन यांच्या संयुक्त विद्यमाने या महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अध्यक्षा उज्वला नंदेश्वर यांनी प्रास्ताविकात भारतीय संविधानाने सर्वांना हक्क व अधिकार दिले असून सामाजिक-आर्थिक न्याय व उत्तम जीवनमान हा त्याचा मुख्य उद्देश आहे. वंचित घटकांपर्यंत शासकीय योजना एकाच छताखाली पोहोचाव्यात, यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, समाजातील वंचित घटक न्यायापासून दूर राहू नयेत यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. कायदा हा भीतीचा



विषय नसून नागरिकांचे संरक्षण करणारा आणि न्याय देणारा आहे, अशी सकारात्मक भावना समाजात निर्माण होणे आवश्यक आहे. न्यायालयाबाबतची भीती दूर व्हावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. शासनाच्या विविध सेवांचा लाभ नागरिकांना एकाच ठिकाणी मिळावा हा देखील उद्देश आहे. कार्यक्रमास जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भूषण एम. काळे, परभणी जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष एस.टी.अडकिने, गंगाखेड तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड. मिलिंद बी. क्षीरसागर आदींसह नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. प्रारंभी विविध योजनांचा प्रातिनिधीक स्वरूपात प्रत्येकी दोन लाभार्थींना मान्यवरांच्या हस्ते लाभाचे वितरण करण्यात आले. या शिबीरांमध्ये विविध शासकीय कार्यालयांचे ४० स्टॉल उभारण्यात आले होते. यावेळी मान्यवरांनी सर्व स्टॉलला भेट देवून पाहणी केली.

## धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना नामांकीत इंग्रजी माध्यमांच्या निवासी शाळांमध्ये प्रवेशासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी** – सन २०२१-२२ पासून राज्य शासनाकडून धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकीत निवासी शाळांमध्ये मोफत शिक्षण देण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. परभणी जिल्ह्यातील इच्छुक भटक्या जमाती क प्रवर्गातील धनगर समाजातील विद्यार्थ्यांच्या पालकांकडून सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता राजे यशवंतराव होळकर इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये प्रवेश देण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत.

सदर शाळांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना शिक्षण, निवास, भोजन, आरोग्य, शैक्षणिक साहित्य, शालेय गणवेश इ. सुविधा शासनाकडून मोफत पुरविण्यात येणार आहेत. प्रवेशाच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत. सदर योजनेचा लाभ घेवू इच्छिणारा विद्यार्थी धनगर समाजातील असावा. विद्यार्थ्यांच्या पालकाने विद्यार्थ्यांचे नावे सक्षम प्राधिका-यांने दिलेल्या धनगर समाजाच्या दाखल्याची साक्षांकित प्रत सादर करावी. विद्यार्थ्यांचे पालकांचे वार्षीक उत्पन्न मर्यादा रु. १.०० लक्ष इतकी असावी. सन २०२५-२६ या वर्षात नविन विद्यार्थी १ ली ते ८ वी या इयत्तेत प्रवेशित असावा. परभणी जिल्ह्यातील धनगर समाजाच्या विद्यार्थ्यांना शहरातील इंग्रजी माध्यमांच्या नामांकित निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याकरिता निवड झालेल्या रामराव नाईक इंग्लिश स्कूल, मुन्सीराम तांडा, ता. सोनपेठ जि. परभणी या शाळेमध्ये प्रवेश घेण्यासाठी सन २०२५-२६ मध्ये १०० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांचे अर्ज २० फेब्रुवारी, २०२६ पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत) सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, परभणी यांचे नावे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जायकवाडी वसाहत, कारेगाव रोड, परभणी या कार्यालयात प्रत्यक्ष सादर करावेत. योजनेचा धनगर समाजातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी लाभ घेण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण सहाय्यक संचालक रामेश्वर मुंडे यांनी केले आहे.

# ‘विकसित भारत २०४७’ या दृष्टीकोनाशी संलग्न कुशल व रोजगारक्षम युवक घडविणारे पीएम-सेतू चर्चासत्र

**आत्ताच एक्सप्रेस**

मुंबई -कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय यांच्यातर्फे पुणे येथे पीएम-सेतू (प्रधानमंत्री स्किलिंग अँड एम्प्लॉयबिलिटी ट्रान्सफॉर्मेशन थ्रू अपग्रेडेड आयटीआयज) योजनेच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून एक महत्त्वपूर्ण उद्योग चर्चासत्र नुकतेच पार पडले. हा कार्यक्रम यशवंतराव चव्हाण अकादमी ऑफ डेव्हलपमेंट ॲडमिनिस्ट्रेशन (यशदा) येथे आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाला केंद्राच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या देबाश्री मुखर्जी, अपर मुख्य सचिव कौशल्य विकास विभाग मनीषा वर्मा या उपस्थित होत्या. यावेळी आयटीआय औंध, पुणे, फ्रोनियस इंडिया प्रा. लि., भोसरी तसेच लाइटहाऊस, निगडी येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यालयीन भेटी देण्यात आल्या.

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचा संचालक माधवी सरदेशमुख यांनी पीएम-सेतू योजनेवर सादरीकरण केले. चर्चासत्रात कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव निरंजन कुमार सुधांशू, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाचे आयुक्त डॉ. अमित सैनी, आरडीएसडीईचे संचालक एस. मूर्ती. चेगोंडी, नवी दिल्लीचे उपसंचालक दिव्यांशू तसेच विविध उद्योगांतील सदस्य उपस्थित होते.

चर्चासत्रात हब-अँड-स्पोक आयटीआय मॉडेल, विशेष उद्देश वाहने यांच्या माध्यमातून उद्योग क्षेत्रातील नवकल्पना तसेच रोजगार परिणाम यांवर होता. उद्योग भागीदारांनी सहकार्याचे फायदे अधोरेखित केले. नोकरीसाठी तयार प्रशिक्षणार्थ्यांची विश्वासार्ह साखळी, आधुनिक प्रयोगशाळा व प्रगत उपकरणांपर्यंत प्रवेश,आयटीआयंचा उत्पादन केंद्रे व नवोन्मेष केंद्रे म्हणून वापर करण्याच्या संधींचाही उल्लेख केला, तसेच प्रशासन रचनेतील बहुसंख्य नियंत्रण, अध्यापन पद्धती व प्राध्यापक कौशल्यवृद्धीवर प्रभाव, नियोक्ता ब्रँडिंगमध्ये वाढ आणि सीएसआर व ईएसजी प्राधान्यांशी संरेखन यांसारख्या धोरणात्मक लाभांवर भर दिला.

पीएम-सेतू ही योजना ऑक्टोबर २०२५ मध्ये प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केली असून, पाच वर्षांत ६०,००० कोटींच्या तरतुदीसह आयटीआयंचे पायाभूत सुविधा वाढविणे, नवीन काळानुरूप अभ्यासक्रम सुरू करणे आणि उद्योग-नेतृत्वाखालील प्रशासन राबवणे, विकसित भारत २०४७ या दृष्टीकोनाशी संलग्न कुशल व रोजगारक्षम युवक घडविण्याचा या योजनेचा हेतू आहे.

ऑटोमोटिव्ह, बांधकाम, वस्त्रोद्योग, एफएमसीजी, इलेक्ट्रॉनिक्स, तेल व वायू तसेच नवीकरणीय ऊर्जा या क्षेत्रांतील सुमारे ३६ पात्र कंपन्यांनी या चर्चासत्रात सहभाग घेतला.

# पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ‘महा पशुधन एक्स्पो’२०२६ ला मुख्यमंत्र्यांची भेट, मंत्री पंकजा मुंडेंची उद्योजक योजनेची घोषणा

**आत्ताच एक्सप्रेस**

परळी वैजनाथ – ‘‘आमची माय आणि आमची माती हेच आमचे खरे प्रेम आहे. ज्याप्रमाणे शिवशंभूंच्या दर्शनापूर्वी नंदीला वंदन करण्याची आपली संस्कृती आहे, त्याच धर्तीवर पशुधनाला केंद्रस्थानी ठेवून आम्ही ग्रामीण अर्थव्यवस्थेला अधिक बळकट करत आहोत. तंत्रज्ञानाच्या जोडणीतून हे क्षेत्र महाराष्ट्राला जागतिक स्तरावर दुग्ध उत्पादनात अग्रेसर करेल,‘‘ असा विश्वास राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

परळीतील अंबेजोगाई रस्ता लगत असलेल्या ओपळे मैदानावर पशुसंवर्धन विभाग आयोजित तीन दिवसीय महा पशुधन एक्स्पोच्या पाहणीनंतर मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. याप्रसंगी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे, आमदार रत्नाकर गुट्टे, पशुसंवर्धन विभागाचे सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन, आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, प्र. मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठम कुलगुरू डॉ. नितीन पाटील, पशुसंवर्धन विभागाचे अतिरिक्त आयुक्त डॉ. शीतलकुमार मुकणे, खासगी सचिव मंदार वैद्य, अपर जिल्हाधिकारी अश्विनी सोनवणे, उपविभागीय अधिकारी अरविंद लाठकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे, पशुसंवर्धन विभागाचे सह आयुक्त, बहुसंख्येने पशुपालक उपस्थित होते.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, ‘‘हे प्रदर्शन केवळ एक सोहळा नसून कोरडवाहू शेतीतील हवामान जोखीम कमी करण्यासाठी उचललेले एक धोरणात्मक पाऊल आहे. पिकांचे नुकसान झाले तर पशुधन हेच शेतकऱ्यासाठी आधार म्हणून काम करते. त्यामुळेच आम्ही गाईला केवळ धार्मिक महत्त्व न देता तिचे आर्थिक योगदान लक्षात घेऊन ‘राज्यमाता’ दर्जा दिला आहे.‘‘

दुग्ध व्यवसायातील तफावत मांडताना मुख्यमंत्री म्हणाले, ‘‘पंजाबमध्ये गाय १०-१५ लिटर दूध देते, तर आपल्याकडे २.५ लिटर ही तफावत भरून काढण्यासाठीचे प्रयत्न सुरु आहेत. पशुधन संवर्धन, आरोग्य व अचूक निरीक्षण आणि उत्पादकता वाढविण्यासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स मिशन चा वापर करण्यात येईल. एम्ब्रियो ट्रान्सप्लांट आणि सेक्स-सॉर्टेड सीमेन तंत्रज्ञानाद्वारे उच्च दर्जाच्या कालवडींची पैदास वाढवून दुग्धोत्पादन वाढवले जाईल. यासाठी विदर्भ-मराठवाड्यात मदर्स डेअरी सोबत करार देखील करण्यात आला आहे.

‘‘पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कृषी क्षेत्राला जागतिक स्पर्धेपासून सुरक्षित ठेवले आहे. भारत- अमेरिका करारात सोयाबीन किंवा कापूस आयातीचा कोणताही उल्लेख नाही. त्यामुळे बाहेरील माल येऊन भाव पडतील, या अफवांवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये,‘‘ असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. याउलट भारतीय शेतकऱ्यांना अमेरिकेची मोठी बाजारपेठ आता खुली झाली असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, ‘‘केवळ नोकरीच्या मागे न लागता गावातील तरुणांनी मालक बनावे, यासाठी आम्ही लवकरच मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना आणत आहोत. महिलांना लखपती दीदी बनवण्यासाठी शासनाकडून शून्य टक्के व्याजावर कर्ज उपलब्ध करून देत आहे.‘‘ तसेच पशुसंवर्धनाला कृषीचा दर्जा देणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य आहे. हा दर्जा दिल्याबद्दल मुख्यमंत्री महोदयांचे मंत्री मुंडे यांनी आभार मानले.

माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनीही परळीच्या विकासासाठी मुख्यमंत्री महोदय यांच्या समोर मागण्या मांडल्या. तसेच बीड व परळीचे विकासासाठी कायम निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्यमंत्री यांचे आभार मानले.

अहिल्यादेवी होळकर शेळी-मेंढी पालन योजनेतील विजेत्यांना आणि गोपाळ रत्न पुरस्कारप्राप्त शेतकऱ्यांना यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते पशुसंवर्धन विभागाच्या महापशुधन वार्ता या मासिकाच्या १०व्या अंकाचे प्रकाशन व विभागाच्या दिनदर्शिका २०२६चे अनावरण केले. मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी ‘महापशुधन एक्स्पो २०२६’मध्ये महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत पात्र महिला बचत गटांना प्रातिनिधिक स्वरूपात कर्ज वितरण केले. जिरेवाडी, ता. परळी येथील तुळजाई महिला स्वयंसहायता समूहास ₹१५,००,००० इतक्या कर्जाचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद)च्या स्मार्ट प्रकल्पांतर्गत बर्दापूर येथील ‘उमेद सखी महिला शेतकरी उत्पादक कंपनी’ला शासन अनुदानाच्या ₹१२,२७,५०० या प्रथम हप्त्याचे वितरण करण्यात आले.

# स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे होणार वेगाने परिवर्तन-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबतच्या करारांमुळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास महाराष्ट्रभर पोहोचविणार

**आत्ताच एक्सप्रेस**

**परभणी** – महाराष्ट्र विविध क्षेत्रांसह देशाच्या प्रगतीमध्ये वेगळा ठसा उमटवीत आहे. राज्याच्या प्रगतीचा वेग असाच कायम ठेवून राज्य शासनाच्या विविध स्वयंसेवी संस्थांच्या भागीदारीतून महाराष्ट्राचे वेगाने परिवर्तन होईल,असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत करण्यात आलेल्या करारावेळी व्यक्त केला. टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन सोबत झालेल्या करारामळे वेगवेगळ्या क्षेत्रातील विकास संपूर्ण महाराष्ट्रभर पोहचविणार असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

याप्रसंगी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, मृदा व जलसंधारण मंत्री संजय राठोड, महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर - साकोरे उपस्थित होत्या.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील प्रत्येक कुटुंबासाठी आरोग्य, पोषण, पाणी सुरक्षा आणि उपजीविका सुधारणे याला शासनाचे प्राधान्य आहे. या भागीदारींमुळे विविध कल्याणकारी शासकीय योजना अधिक लोकोपयोगी होण्यास मदत होणार आहे. शासनाच्या योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत आहे. टाटा ट्रस्टचे सहकार्याने विविध विभागांच्या माध्यमातून सकारात्मक प्रभाव पाडण्यात यशस्वी होऊ. समाजातील सर्व घटकात उत्पन्न वाढून जगण्याचा स्तर उंचावण्यास यामुळे निश्चितच मदत होईल. दुर्धर आजारांवर महागड्या उपचार पद्धतीमुळे सामान्य नागरिकांना मर्यादा येतात मात्र राज्यात यापुढे उपचाराविना कुणीही मृत्यू पावणार नाही, अशी परिस्थिती निर्माण करण्यात येत आहे. टाटांची मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये मोठी मदत असून यामुळे आपण गरजू रुग्णांना निश्चित स्वरूपाची मदत देऊ शकतो.

मुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, मागील दहा वर्षापासून टाटा ट्रस्ट सोबत शासन काम करीत आहे. केवळ निधी देऊन भागीदारी होत नाही, तर काम करून समाजात सकारात्मक प्रभाव पाडणारी भागीदारी टाटा करत असते. हे बहु-आयामी करार माता, नवजात बालक, बाल आणि किशोरवयीन घटकांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे, खुंटलेली वाढ रोखून कुपोषणावर उपाय शोधण्यासाठी मदतगार ठरतील. या सोबतच पोषणासाठी आहारात वैविध्य आणणे, जलस्रोतांचे अधिक शाश्वतपणे जतन आणि व्यवस्थापन, ग्रामीण महाराष्ट्रात हवामान आधारित कृषी आणि पशुधन विकासाला चालना देण्याची क्षमता या भागीदारीत आहे.

नाम फाउंडेशन राज्यात जलसंधारणामध्ये मोठे काम करीत आहे. मागील काळात जल स्त्रोतांमधील गाळ काढणे , नाला,नदी खोलीकरण व रुंदीकरण आदी कामे करण्यात आली आहेत. राज्यात जलयुक्त शिवार योजना यशस्वीपणे राबविण्यात आली. ही योजना लोक चळवळीच्या स्वरूपात पुढे येत जनतेची योजना झाली. नाम फाउंडेशनच्या सहभागाने विदर्भ व मराठवाड्यातील कमी पर्जन्यमान असलेल्या भागात जलसंधारणाचे मोठे काम झाले. यासाठी टाटा मोटर्स चीही मदत झाली असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले.

टाटा ट्रस्ट चे अध्यक्ष नोएल टाटा म्हणाले, महाराष्ट्र शासनाशी भागीदारी करून आरोग्य, शिक्षण, पोषण, उपजीविका, पाणी आणि स्वच्छता कार्यक्रमांमध्ये सुसूत्रता आणणार आहे. सर्व सामन्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न राहणार आहे. शासनाचे विविध विभाग आणि समुदायांसोबत सकारात्मक परिणाम आणण्याचा हेतू असणार आहे. शासन आणि टाटा ट्रस्ट्स यांनी आज राज्याच्या एकात्मिक विकासाला पाठबळ देण्यासाठी सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करून धोरणात्मक भागीदारी अधिकृत केली आहे. नाम फाउंडेशनचे नाना पाटेकर यांनीही शासनासोबत जलसंधारण क्षेत्रात काम करण्यास मदत मिळत असल्याबाबत समाधान व्यक्त केले.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सचिव (आरोग्य) डॉ. निपुण विनायक, सचिव (महिला व बालविकास) अनुपकुमार यादव, टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा, नाम फाउंडेशनचे संस्थापक नाना पाटेकर, मकरंद अनासपुरे, टाटा ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सिद्धार्थ शर्मा आदींसह टाटा ट्रस्ट व नाम फाउंडेशन च पदाधिकारी उपस्थित होते.

सामंजस्य करार तंत्रज्ञान, डिजिटल नवोपक्रम आणि लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी याद्वारे आरोग्य, पोषण, जलसंधारण आणि ग्रामीण उपजीविका यांमधील शासकीय प्राधान्यक्रमांना पाठबळ देणे, समुदायांपर्यंत प्रमुख कल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, नागपूर येथील सहा मान्यताप्राप्त रुग्णालयांसोबत केलेल्या करारांद्वारे, गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य देणे, मुख्यमंत्री सहाय्यता निधी अंतर्गत दुर्धर गंभीर आजारांमध्ये सुलभ व कमी खर्चाचे उपचार उपलब्ध करून देणे आहे.

माता, नवजात बालक, बालक आणि किशोरवयीन मुलांसाठी आरोग्य सेवा बळकट करणे; टेलिमेडिसिनसह इतर माध्यमांतून उपचार सहज देणे, शहरी आणि दुर्गम भागातील सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा वाढवणे, एकात्मिक आपत्कालीन व्यवस्थापन सेवाद्वारे उत्तम आपत्कालीन प्रतिसादास पाठबळ देणे. दोन वर्षांखालील मुलांमधील खुंटलेली वाढ, कमी वजन आणि कुपोषण रोखण्यास मदत करणे, किशोरवयीन कुपोषण आणि रक्तक्षय दूर करणे, गडचिरोली सारख्या जिल्ह्यांवर विशेष लक्ष केंद्रित करून टेक-होम रेशन सारख्या योजनांचे वितरण मजबूत करणे, तलावांचे पुनरुज्जीवन, जलकुंभ आणि नद्यांमधील गाळ काढणे, भूजल पुनर्भरण सुधारणे, मराठवाडा आणि विदर्भासह पाणीटंचाईग्रस्त भागांवर विशेष भर देऊन मृद व जलसंधारण योजनांची अंमलबजावणी करणे, हवामान बदलांचा अभ्यास करून शेतीला प्रोत्साहन देणे, वन-आधारित आणि ग्रामीण बिगर-शेती उपजीविकेला पाठबळ देणे, आरोग्य, शिक्षण, पोषण, पाणी, स्वच्छता आणि उपजीविका या सर्वांना एकत्र आणणारा एकात्मिक ग्राम विकास साधणे.

टाटा ट्रस्टच्या सोबत शासनाने एकूण १२ करार केलेले आहेत. यामध्ये ग्रामविकास, जलसंधारण, सार्वजनिक आरोग्य, महिला व बालविकास, गडचिरोली जिल्हा प्रशासन, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, नागपूर येथील राष्ट्रीय कर्करोग संस्था, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, मध्य भारत आयुर्विज्ञान संस्था, केअर हॉस्पिटल, स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन, मिदास मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल सोबत सामंजस्य करारांचा समावेश आहे. तसेच नाम फाउंडेशन, टाटा मोटर्स यांचा जलसंधारण विभागासोबत करार करण्यात आला आहे.

दैनिक निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस

महाराष्ट्रातील दै. आत्ताच एक्सप्रेस या लोकप्रिय वृत्तपत्राच्या परभणी-नांदेड व हिंगोली आवृत्तीसाठी तालुका व शहर पातळीवर अनुभवी किंवा नवीन पत्रकार नेमणे आहे. ज्यांना पत्रकारीता क्षेत्रात काम करण्याची आवड आहे अशा होतकरु पत्रकारांनी संपर्क करावा.

नांदेड जिल्हा : अर्धापुर, भोकर, बिलोली, देगलूर, हदगाव, हिमायतनगर, कंधार, लोहा, मुदखेड, मुखेड, नांदेड, नायगांव आणी उमरी

परभणी जिल्हा : परभणी, गंगाखेड, सोनपेठ, पाथरी, मानवत, पालम, सेलू, जिंतुर आणि पुर्णा

हिंगोली जिल्हा : हिगोली, कळमनुरी, वसमत, औंढा नागनाथ आणि सेनगाव

लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे
आवृत्ती संपादक : आत्ताच एक्सप्रेस
संपादक : मराठीबाणा न्युज LIVE
अध्यक्ष : महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ,किनवट

संपर्क कार्यालय : उपजिल्हा रुग्णालय मार्ग,गोकुंदा ता.किनवट जि.नांदेड
मो.9022822289, 7066650600
Email : attachexpressparbhani@gmail.com

# रुचिया बेटकर यांच्या भावविश्वाचा 'कोलाज' १ मार्चला रसिकांच्या भेटीला... नांदेड मध्ये भव्य प्रकाशन सोहळा

**आत्ताच एक्सप्रेस**
**नांदेड । लक्ष्मीकांत मुंडे**

मराठवाडा साहित्य परिषद शाखा नांदेड आणि ड्रीमअप प्रकाशन नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने कवयित्री रुचिया बेटकर यांच्या 'कोलाज भावनांचा' या कविता संग्रहाचा प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न होणार आहे. साहित्यप्रेमींसाठी हा एक विशेष साहित्यिक पर्व ठरणार असून नांदेड शहरातील साहित्यविश्वात या कार्यक्रमाबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी देवीदास फुलारी (सदस्य, अ. भा. मराठी साहित्य महामंडळ) राहणार आहेत. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध लेखिका व समीक्षक डॉ. वृशाली किन्हाळकर उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून सुप्रसिद्ध कवी व समीक्षक डॉ. पी. विठ्ठल, प्रसिद्ध कवी जगन शेळके आणि मसाप शाखा नांदेडचे अध्यक्ष बालाजी इबितवार यांची उपस्थिती लाभणार आहे.

हा प्रकाशन सोहळा रविवार, दिनांक १ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे स्थळ हॉटेल विसावा पॅलेस, शिवाजीनगर पोलीस स्टेशन मागे, नांदेड असे आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कथाकार तथा आकाशवाणी निवेदक राम तटटे करणार आहेत. या कार्यक्रमाचे विनीत निमंत्रक म्हणून ड्रीमअप प्रकाशन नांदेडचे प्रकाशक दत्ता डांगे, तसेच नितीन सोनकांबळे आणि शिवाजी बेटकर यांनी साहित्यप्रेमींना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

'कोलाज भावनांचा' या कविता संग्रहातून कवयित्री रुचिया बेटकर यांनी विविध भावविश्व, नातेसंबंध, संवेदना आणि सामाजिक वास्तव यांचे काव्यमय चित्रण केले असून साहित्य रसिकांमध्ये या पुस्तकाबाबत विशेष उत्सुकता आहे. या प्रकाशन सोहळ्यास साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.




# पैनगंगेतून वाळू चोरून नेणारा ट्रॅक्टर पोलिसांनी पकडला

## महसूल पाठोपाठ पोलिसांचिही वाळू माफिया वर जबर कार्यवाही, चार लाखांचा मुद्देमाल जप्त



**आत्ताच एक्सप्रेस**

**श्रीक्षेत्र माहूर** – महसूल विभागाकडून माहूर तालुक्यातील लिलाव झालेले पाच वाळू घाट सुरू न केल्याने खेड्यापाड्यात रात्री ट्रॅक्टर द्वारे पैनगंगा नदीपात्र तसेच नाल्यातून वाळू तस्करी सुरू असून माहिती मिळताच महसूल आणि पोलीस विभाग ट्रॅक्टर पकडून जप्त करत असूनही वाळू तस्करी थांबायचे नाव घेत नाही मौजे दिगडी परिसरात गुप्त माहिती मिळाल्याने पैनगंगा नदी पात्रातून वाळू चोरी करून धानोरा दिगडी कडे येत असलेला ट्रॅक्टर पोलीस निरीक्षक देविदास चोपडे आणि पथकाने रंगेहात पकडून माहूरच्या पोलीस ठाण्यात आणून जप्त केल्याची घटना दि १४ रोजी १०.३० वाजता घडली आहे

पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे यांच्या आदेशाने पोलीस निरीक्षक देविदास चोपडे पथकासह तालुक्यात तील गावात भेटी देत होते गुप्त माहिती दाराने माहिती दिल्यावरून पैनगंगा नदीपात्र ते धानोरा एक ट्रॅक्टर वाळू भरून येत असल्याची माहिती मिळाली त्यावरून सापळा रचण्यात आला पाणंद रस्त्यावरून येतं असलेल्या ट्रॅक्टरला त्यांनी मुख्य रस्त्यावर येऊ दिले त्यानंतर त्यावर अचानकपणे धाड टाकून २६ २६०८ या ट्रॅक्टरची चौकशी केली असता त्याकडे कुठलीच परवानगी नसल्याने त्यास जप्त करून माहूरच्या पोलीस ठाण्यात आणून चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करत एकूण ४ लाख ६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे सदरील कारवाईत पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांचे सह पोहेका गजानन चौधरी पोका पवन राऊत यांचे सह पोलीस कर्मचाऱ्यांनी मोलाची कामगिरी बजावली

# भोकर नगर परिषदेत स्विकृत नगरसेवक म्हणून संधी देण्याची चंद्रकांत मुस्तापुरे यांची मागणी



**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकर** – भोकर शहराच्या विकासासाठी पक्षीय राजकारण न करता सर्व सामान्य लोकांना आपलेसे करुन विकासासाठी सातत्याने झटणाऱ्या व नागरीकांच्या प्रश्न सोडविण्यासाठी माझ्या सारख्या सुशिक्षित तरुणाला नगरपरिषद स्विकृत सदस्य पदी निवड करुन न्याय द्यावा अशी मागणी समाजसेवक चंद्रकांत मुस्तापुरे यांनी नगराध्यक्ष भगवान दंडवे यांना निवेदनाद्वारे विनंती केली आहे.

नगराध्यक्ष यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,मी सामाजिक कार्यकर्ता चंद्रकांत मुस्तापुरे स्वामी असुन भोकर नगरपरिषद स्विकृत सदस्य नियुक्ती करण्यात येणार असल्याने हि निवड सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक अनुभव असलेल्या नागरीकाची निवड करणे योग्य राहील.मी समाजकार्य व राजकारण करत असताना शहरातील विकासकामांसाठी सातत्याने सरकारकडे मागणी करतो.मला भोकर शहरातील अनेक समस्या चे आकलन आहे. नागरीकाशी सतत चर्चा करुन विकासा संदर्भात शासनाकडे पाठपुरावा करत असतो.त्यामुळे स्विकृत सदस्य निवडत असताना मायेचा बाजार न करता आणि पक्षीय राजकारण बाजूला ठेवून माझ्या सारख्या सुशिक्षित तरुणाला संधी द्यावी.मी या संधीचा सोनं करीन.याचा विचार करावा असे निवेदनात म्हटले आहे.

# हातभट्टी दारूचे दोन अड्डे उध्वस्त, हिवळणी पापळवाडी परिसरात दहशत






**आत्ताच एक्सप्रेस**


**श्री क्षेत्र माहूर** – माहूर तालुक्यातील मौजे हिवाळनी पापळवाडी येथे मासरेड अंतर्गत झालेल्या कारवाईत अवैधरित्या हातभट्टी दारू गाळपणारे दोन अड्डे उध्वस्त करून पोलिसांनी साडेसहाशे लिटर दारूचा नाश करून पो नि देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली स पो नी संदीप अन्येबोईनवाड यांनी दोन आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केल्याची घटना दि १४ रोजी दुपारी १२ वाजता घडली आहे

पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या संकल्पनेतील ऑपरेशन फ्लॅश आउट अंतर्गत पोलीस अधीक्षक अविनाश कुमार उपविभागीय पोलीस अधिकारी किरण कुमार भोंडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांनी बनविलेल्या पथकाद्वारे मास रेड अंतर्गत हातभट्टी दारू अवैधरित्या देशी विदेशी दारू विकणाऱ्या विरुद्ध धडाकेबाज कारवाया सुरू आहेत

दिनांक १४ रोजी गोपनीय माहिती मिळाल्याने हिवळणी पापलवाडी परिसरात दोन ठिकाणी हातभट्टीची दारू बनवीत असल्याची माहिती मिळाल्याने पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी संदीप अन्येबोईनवाड यांचे सह पथकाने एका ठिकाणी सहाशे लिटर रसायन तर दुसऱ्या ठिकाणी ५० लिटर बनविलेली दारू असा एकूण साडेसहाशे लिटर माल ज्याची किंमत ३९ हजार रुपये त्या ठिकाणी धाड टाकून सदरील दारू बनविण्याचे रसायन व बनविण्यात आलेली दारू नष्ट करून दोघाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे

या पथकात पो उपनि पालसिंग ब्राह्मण, पोउपनि संदीप अन्येबोईनवाड, पो हे का गोपनवाड,मडावी मोहुर्ले, सोनसळे, मामीलवाड, होमगार्ड उमेश भगत, सलमान खान, चूगडे, गिनगुले यांचे सह कर्मचाऱ्यांनी मोलाची कामगिरी बजावली.





# किनवट पोलिसांची मासरेड कारवाई; ६०० लिटर हातभट्टी दारू निर्मितीचे मोहफुल रसायन जप्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**किनवट** – किनवट पोलीस ठाणे हद्दीत आज करण्यात आलेल्या विशेष मासरेड कारवाईदरम्यान मोजे डोंगरगाव येथे मोठी कारवाई करण्यात आली. अवैधरित्या हातभट्टी गावठी दारू तयार करण्यासाठी वापरले जाणारे अंदाजे ६०० लिटर मोहफुल रसायनयुक्त साहित्य पोलिसांनी जप्त केले असून एकूण ३६,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपी मोतीराम नागोराव हुरदुके याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत. सदर कारवाई पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. या पथकात पोलीस हेडकॉन्स्टेबल आत्राम, वाघमारे, पोलीस कॉन्स्टेबल रांजणे तसेच महिला कॉन्स्टेबल मंजू पवार यांचा समावेश होता. तसेच बीट जमादार सिद्धार्थ वाघमारे हे पुढील तपास करत आहेत. अवैध दारू निर्मिती व विक्रीविरोधात किनवट पोलीसांनी कठोर भूमिका घेतली असून अशा प्रकारच्या कारवायांमुळे बेकायदेशीर व्यवसायांना मोठा आळा बसणार असल्याचे पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन किनवट यांनी सांगितले. अवैध धंद्यांविरोधात अशाच प्रकारे कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

# आठव्या अ. भा. गुरु रविदास साहित्य संमेलनाची नांदेड येथे जय्यत तयारी..!

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड** – येत्या रविवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी नांदेड येथे आठवे अखिल भारतीय एक दिवसीय भव्य गुरु रविदास साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले असून त्याची जय्यत तयारी करण्यात येत असल्याची माहिती या संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रवीण जेठेवाड तथा मुख्य प्रवर्तक इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी दिली.

शिवपार्वती मंगल कार्यालय भावसार चौक नांदेड येथील संमेलन स्थळास महान क्रांतिकारी बिरसा मुंडा यांचे नाव देण्यात आले असून येथे रविवारी दिवसभर भरगच्च साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात ग्रंथयात्रा, ध्वजारोहण, उदघाटन सत्र, परिसंवाद, कथाकथन, सांस्कृतिक कार्यक्रम, गीत, संगीत, नृत्य, भारुड, एकपात्री नाट्यप्रयोग, कविसंमेलन व समारोप कार्यक्रमाचा समावेश आहे.

या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षस्थानी अकोला येथील सुप्रसिद्ध साहित्यिक लेखिका प्रा. डॉ. सौ. निर्मला पुंडलिक भामोदे ह्या राहणार असून नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप साहेब यांच्या हस्ते या संमेलनाचे उद्घाटन सकाळी १०:३० वाजता होणार आहे. तत्पूर्वी सकाळी ९ वाजता गुरु रविदास चौक, तरोडा नाका नांदेड येथून ग्रंथयात्रा निघणार असून अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष बालाजीराव जमदाडे (परभणी) यांच्या हस्ते ग्रंथयात्रेचे उद्घाटन होणार आहे.

या ग्रंथयात्रेचे संमेलन स्थळी आगमन झाल्यानंतर सकाळी ९:३० वाजता अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे तेलंगणा प्रदेशाध्यक्ष राजेश खंदारे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. यावेळी अल्पोपहारानंतर सकाळी १०:३० वाजता दीप प्रज्वलन आणि संविधान प्रास्ताविका वाचनानंतर उद्घाटन होणार आहे. यावेळी गुरुद्वारा लंगर साहिबचे प्रमुख स. बाबा बालविंदरसिंग यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

हदगाव येथील सहाव्या अखिल भारतीय गुरु रविदास साहित्य संमेलनाचे माजी संमेलनाध्यक्ष सुभाष सोनवणे (अहिल्यानगर), चर्मकार विकास संघाचे प्रदेशाध्यक्ष संजय खामकर (अहिल्यानगर), सुप्रसिद्ध विचारवंत व सदस्य, जमाते इस्लामी हिंद, संत साहित्य अभ्यासक डॉ. रफिक पारनेरकर (अहिल्यानगर), लोकस्वराज आंदोलनाचे संस्थापक प्रा. डॉ. रामचंद भरांडे (नांदेड), सिने कलाकार मुरली मनोहर टी. (हैदराबाद) आणि पीपल्स रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव बापुराव गजभारे यांची यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती राहणार आहे.

महावितरणचे सेवानिवृत्त मुख्य अभियंता रामदास कांबळे, पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, संतोष तांबे, बाळासाहेब रोकडे, महापारेषणचे कार्यकारी अभियंता आफताब खान, माजी जि. प. सदस्य साहेबराव धनगे, सामाजिक कार्यकर्ते जगदीश बेदवे (सिल्लोड), ॲड. दिलीप वाळंज (अंबरनाथ), बसपाचे प्रदेश सचिव दिगंबर मोरे, बामसेफचे मराठवाडा प्रमुख मिलिंद बनसोडे, राम गायकवाड (बीड), बाबुराव वाघमारे (येरोळ), गणेश गायकवाड (उदगीर), बिरसा मुंडा जयंती उत्सव समितीचे नांदेड जिल्हाध्यक्ष राजेश्वर पालेपवाड, गणेश कांबळे (लातूर रोड), ॲड. शिवराज कोळीकर (नांदेड), कामगार नेते गौतम भद्रे, जमात ए इस्लामी हिंद नांदेडचे आबेद खान पठाण यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

छ. संभाजीनगरचे सेवानिवृत्त पोलीस उपायुक्त बालाजीराव सोनटक्के हे वाळूज जिल्हा परिषद निवडणुकीत विजयी झाल्याबद्दल त्यांचा या साहित्य संमेलनात सत्कार करण्यात येणार आहे तसेच सुरज ग्रुप ऑफ इंडस्ट्रीजचे अध्यक्ष रमेश पारसेवार यांना जीवन गौरव, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते व्यंकटराव दुधंबे यांना समाजभूषण तर योगेश छबिलवाड (छ. संभाजीनगर) यांना बिरसा मुंडा युवा क्रांती पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

यावेळी विजयकुमार कदम (मुंबई) लिखित ''लॉकडाऊनमधील प्रेम'' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. शेवटी संमेलनाध्यक्षा प्रा. डॉ. निर्मला भामोदे यांचे भाषण होणार आहे. यावेळी बालाजी फुलपगार आणि पत्रकार रमेश गंगासागरे (भोकर) हे संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करतील. कुसुम गणेश गायकवाड (नांदेड) ह्या स्वागतगीत सादर करतील तर इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर यांचे प्रास्ताविक होईल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मीनाक्षी नारायण वाघमारे तर शेवटी आभार प्रदर्शन प्रियंका विपुल देगलूरकर ह्या करतील.

**बेगमपूर राज्याची संकल्पना**

पाचव्या सत्रात दुपारी बारा वाजता ''बेगमपूर राज्याची संकल्पना व भारतीय संविधान'' या विषयावर परिसंवाद होणार असून अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष शिवाजीराव लकवाले (उदगीर) हे या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी राहतील. राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड (नांदेड), विचारवंत बालाजीराव साबळे (लातूर) आणि महिला सामाजिक कार्यकर्त्या सौ. मंगल रमेश दुधम्बे हे विषयावर आपले विचार मांडतील. यावेळी शाहिर प्रदीप कडबे (रामटेक) आणि तुकाराम जाधव (कोरपना) हे क्रांतिगीते सादर करतील. याचे सूत्रसंचलन माया कर्नाडे (जालना) आणि आभार प्रदर्शन अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे जालना जिल्हाध्यक्ष गणेश शिंदे हे करतील.




सहाव्या सत्रात दुपारी दीड वाजता एकपात्री प्रयोग ''मी रमाई बोलतेय !'' गायत्री रामटेके (बल्लारशा) ह्या सादर करतील. याचे सूत्रसंचलन राहुल खंदारे (उमरी) हे करतील तर आभार प्रदर्शन सौ. विद्या अरुण उकंडे (नांदेड) ह्या करतील. सातव्या सत्रात दुपारी दोन वाजता भोजन अवकाश जाहिर करण्यात आला आहे. महाशिवरात्री निमित्ताने उपवासाच्या फराळाची व सुरुची भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

दुपारी अडीच वाजता सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. त्यात कु. शिपा मंगेश पवार (भद्रावती) ह्या संगीत नृत्य सादर करतील तर सौ. वंदना संभाजी वाघमारे (बिटरगाव ता. उमरखेड) ह्या सामाजिक आशयाचे भारुड आणि बुरगुंडा सादर करतील. या आठव्या सत्राचे सूत्रसंचलन अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे नांदेड जिल्हाध्यक्ष गंगाधर गंगासागरे हे करतील तर जिल्हा महासचिव प्रकाश कामळजकर हे आभार प्रदर्शन करणार आहेत.

नवव्या सत्रात दुपारी तीन वाजता विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार आणि पुरस्कार वितरण सोहळा होईल. याचे सूत्रसंचलन इंजि. चंद्रप्रकाश देगलूरकर हे करतील. दहाव्या सत्रात दुपारी पावणे चार वाजता सुप्रसिद्ध कथाकार बालाजी पेटेकर (नायगाव) हे कथाकथन करतील. याचे सूत्रसंचलन अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे जिल्हा संघटक संतोष सुर्यवंशी (उमरी) हे करतील.

अकराव्या सत्रात सायंकाळी चार वाजता तेलंगणा राज्यातील आदिलाबाद येथील सुप्रसिद्ध राष्ट्रीय कवी मधु बावलकर यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलन होईल. पनवेल जि. रायगड येथील ज्येष्ठ कवी नागनाथ डोलारे हे कवी संमेलनाचे उद्घाटन करतील तर आर्णी येथील सुप्रसिद्ध कवी तथा अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य संवर्धन महामंडळाचे कार्याध्यक्ष प्रशांत वंजारे हे यावेळी काव्यविषयक आपले मनोगत व्यक्त करतील. पुसद जिल्हा यवतमाळ येथील सुप्रसिद्ध कवी प्रा. रविप्रकाश चापके हे या कवी संमेलनाचे बहारदार सूत्रसंचलन करतील.

कवी सदानंद मोरे (अकोला), सुभाष मानवटकर निळे पाखरु (हिंगणा, नागपूर), रामेश्वर पोहेकर (तेल्हारा), शाहिस्ता खान (यवतमाळ), बुद्धघोष लोणे (वणी), बबन मोरे, समाधान लोणकर, एस. टी. मोरे (सर्व हिंगोली), सोपान अंभोरे (रिसोड), बबन ढोके (हट्टा), अशोक वासाटे (किनवट), प्रा. रमेश वाघमारे (पुसद), प्रमोद तायडे (अकोला), शफी बोल्डेकर (बोल्डा ता. कळमनुरी), नानाभाऊ माळी (पुणे), कमलेश पाटील (वर्धा), राहुल श्यामकुंवर (रामटेक), गौतम शिंगणकर (आदिलाबाद), चंद्रकांत गायकवाड (देगाव ता. नायगाव), भीमराव बैलके, देविदास सुर्यवंशी (नायगाव) आणि नांदेड येथील क्रांतिकुमार पंडित, शेख आरिफ निमटेकर, माधव बैलके, आ. ग. ढवळे, ज्योती गायकवाड, एन. सी. भंडारे, प्रा. संजय मांजरमकर, डॉ. विलासराज भद्रे, शकुंतला गायकवाड इत्यादी कवी/कवयित्री आपल्या कविता सादर करतील.

शेवटचे बारावे सत्र समारोपाचे असून सायंकाळी सहा वाजता हे सुरु होईल. यावेळी मुख्य अतिथी म्हणून प्रा. डॉ. जनाबाई वाघमारे (कलबुर्गी, कर्नाटक) तर प्रमुख वक्ते म्हणून बसपाचे स्टार प्रचारक युवा नेते अकरम शेख (सिल्लोड) हे मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मानवाधिकार संघटनेचे शिवदास महाजन (पुणे), सामाजिक कार्यकर्ते सुकुमार पेटकुले (आदिलाबाद), बौद्ध धम्म प्रचारक प्रा. डॉ. आनंद भालेराव (किनवट), राधाई अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटीचे मार्गदर्शक नरसिंग सुर्यवंशी (नांदेड), सुफी शमसोद्दीन सय्यद (लातूर), शिवानंद जोगदंड (नांदेड), अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष सुरेश गंगासागरे (जालना) आणि विस्तार अधिकारी विठ्ठल भागाराम कांबळे (नांदेड) हे उपस्थित राहणार आहेत.

या सत्राचे सूत्रसंचलन राष्ट्रीय ढोर समाज संघटनेचे प्रदेश महासचिव नामदेव फुलपगार आणि कवी डॉ. विलासराज भद्रे हे करणार असून अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे युवा विभागीय प्रवक्ता चंद्रसेन गंगासागरे (घुंगराळा) हे आभार प्रदर्शन करतील.

एकूण बारा सत्रात भरगच्च कार्यक्रम होणार असून या सर्वांचा आस्वाद घेण्याचे आवाहन आयोजक मनीषभाऊ कावळे (बसपा मराठवाडा झोन प्रभारी), निमंत्रक उत्तम गायकवाड, लोकस्वराज आंदोलनाचे रावसाहेब पवार, संयोजक नारायण वाघमारे, रोहिदास सुर्यवंशी, अभिषेक साळे, हणमंत उतकर, जिल्हा संघटक संतोष सुर्यवंशी, दादाराव वाघमारे, नारायण अन्नपुरे, श्रीनिवास कांबळे, लक्ष्मण वाघमारे, अशोक घाटे, व्यंकटराव हराळे, सतीश भालके, जी. पी. गंगासागरे, सुधाकर खैराव, रमेश गंगासागरे, संजय बनसोडे, ॲड. रितेश बनसोडे, प्रसाद कमलेश्वर, बाबुराव नरहिरे, राहुल गोरे, देविदास गंगासागरे, सुरेश वाघमारे, विपुल देगलूरकर, सुभाष वाघमारे, परमेश्वर गंगासागरे, रमेश वाघमारे, प्रसेनजीत मांजरमकर, आनंद चंदनकर, दशरथ डोंगरे, नंदू देशमाने, विजय उतकर, राजू भालके आदींनी केले आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ ✻ **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813